web: http://navakal.org,
e-mail- info@navakal.org

वर्ष-९० | अंक-२० | मुंबई | मंगळवार २७ मार्च २०१२ | संपादक : सौ. जयश्री खाडिलकर-पांडे | पाने-८ | किंमत: ₹ २

REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14

एक प्रसिद्ध विद्यापीठ
**कान्हेरी गुंफा**

पान ८

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

एक चळवळ

# महाराष्ट्राचे महाराज्य बनविणार! अर्थमंत्र्यांची फसवी गर्जना

# स्वयंपाकाचा गॅस महागला! इतरही वस्तू महागणार!

## महाग

आच्छादनाचे **कापड** (५ टक्के अबकारी कर), **विडी** (१२.५ टक्के कर), **घरगुती गॅस** (५ टक्के कर), **प्लॅस्टर ऑफ पॅरिस** (७ टक्के वाढीव कर), **विमान इंधन** (५ टक्के कर), **कापूस, तेलबियाणे** (खरेदी कर लावणार), **नैसर्गिक वायू** (सीएनजी) (१२ टक्के कर), **कार, जीप** (२ टक्के व ४ टक्के वाढ), **मुद्रांक शुल्क.**



**मुंबई, सोमवार - महाराष्ट्राचे महाराज्य बनविणार, अशी फसवी घोषणा बेधडकपणे करीत अर्थमंत्री अजित पवार यांनी स्वयंपाकाच्या गॅसवर पाच टक्के कर आकारत गॅस २२ रुपयांनी महाग केला. त्याचबरोबर सीएनजी गॅस आणखी महाग करून टॅक्सी आणि रिक्षाचे भाडे पुन्हा वाढणार, हे स्पष्ट केले. गरिबाची विडीही महाग करण्यात आली आहे. यामुळे सामान्य माणसाला काहीच दिलासा मिळालेला नाही.**

२०१२-१३ चा अर्थसंकल्प सादर करताना ना. अजित पवारांनी २ हजार कोटींचा महसुली तुटीचा अर्थसंकल्प सादर केला. ही तुटी भरून काढण्यासाठी कर्ज घेतले जाईल आणि या कर्जाचा बोजा सामान्य माणसाला सोसावा लागेल. महसुली तूट भरून काढण्यासाठी विक्रीकर वाढविला आहे. म्हणजेच सामान्यांवर अप्रत्यक्षपणे महागाई लादली आहे. विक्रीकर वाढल्याने वस्तूंचे दर वाढणार असून त्याचा फटका गरिबाच्या खिशाला बसणार आहे.

या अर्थसंकल्पाची त्यातल्या त्यात चांगली बाजू म्हणजे सरकारने प्रथमच शेतकऱ्याकडे लक्ष देऊन त्यांच्यासाठी पायाभूत सुविधा, रस्ते, वीज-निर्मिती, गावतळी आदींसाठी योजना सादर केल्या आहेत. मात्र त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती होईल, हा प्रश्न आहेच.

२०१२ पर्यंत राज्य भारनियमनमुक्त होईल, अशी भीमगर्जना ना. अजित पवार यांनी केली आहे. आताच राज्यातील शहरात १४ तास आणि ग्रामीण भागात १६ तास भारनियमन सुरू झाले आहे. हे भारनियमन कमी करायचे तर अपारंपरिक वीज-निर्मिती हा एकच मार्ग आहे. मात्र या अर्थसंकल्पात अपारंपरिक वीज-निर्मितीसाठी केवळ ७५ कोटींची तरतूद आहे.

एकूणच 'महाराष्ट्राचे महाराज्य होईल' ही निवडणूक घोषणा ठरणार आहे. महाराष्ट्राला मृत्यूपासून वाचवा अशी याचना करण्याची वेळ येणार आहे. आजच्या अर्थसंकल्पानंतर सामान्य माणूस अधिकच निराश होईल. गॅसवरील करवाढीच्या विरोधात भाजपा राज्यभर आंदोलन करणार आहे.

पुढील मजकूर पान ४ वर

## स्वस्त

**हातमाग, यंत्रमाग सूट** (३ टक्के कर कमी), **फळे, पॅड, पेन, विविध शालेय वस्तू, स्टेशनरी** (७ टक्के कमी), **कुक्कुटपालन, सीएनजी बसविलेली वाहने, शाकाहारी पदार्थ, सुकामेवा, काजू, ॲडल्ट डायपर, सॅनिटरी नॅपकिन, बॅटरीवर चालणारी वाहने.**



## दिवेआगारची सुवर्ण गणेशमूर्ती सापडावी

## आज रात्री मुंबईभर गणेश मंदिरांत प्रार्थना

मुंबई, सोमवार - रायगड जिल्ह्यातील दिवेआगार येथील गणेश मंदिरात असलेली सुवर्ण गणेशमूर्ती दरोडेखोरांनी लुटून नेली. या मूर्तीचा अद्याप शोध लागलेला नाही. ही मूर्ती सापडावी यासाठी उद्या मंगळवार २७ मार्च रोजी रात्री ९ ते १० या वेळेत मुंबईतील विविध गणेश मंदिरांत विशेष आरती करून प्रार्थना करण्यात येणार आहे.

लालबाग गणेश मंडळ, विलेपार्ले पेशवा श्री गणेशोत्सव मंडळ, घाटकोपर भटवाडी मंडळ, शिवडी प्रबोधनकार ठाकरे उद्यान मंडळ, काळाचौकी अभ्युदयनगर मंडळ, गणेशगल्ली गणेशोत्सव, राणीबाग रतनजी पालनजी मंडळ, नाना चौक बाळगोपाळ मंडळ, कुंभारवाडा गिरगाव मंडळ, भांडुप विकास मंडळ, लालबाग तेजुकाय मॅन्शन, परळ नवमहाराष्ट्र उत्कर्ष, ताडदेव तुळशीवाडी आणि बोरिवली कस्तुरपार्क या मंडळांतर्फे आरती घेण्यात येणार आहे. 'नवाकाळ'च्या संपादक सौ. जयश्री खाडिलकर-पांडे आणि मुख्यत: बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष दहिबावकर व प्रमुख सल्लागार ज्योतिर्भास्कर जयंत साळगांवकर यांनी पुढाकार घेतला.

उद्या सायंकाळी ९.१५ वाजता मुंबईच्या सिद्धिविनायक मंदिरात होणाऱ्या आरतीला समन्वय समितीचे अध्यक्ष ॲड. नरेश दहिबावकर आणि पदाधिकारी तुकाराम राऊत, गिरीष वालावलकर, कुंदन आगासकर, पपी पाटील, शिरीष मोदी, बाबा कुळकर्णी व 'नवाकाळ'च्या संपादक सौ. जयश्री खाडिलकर-पांडे उपस्थित राहणार आहेत.

वेळेच्या अभावामुळे समन्वय समिती काही गणेश मंडळे व गणेश मंदिरांशी संपर्क साधू शकलेली नाही. तरी सर्वांनीच आपापल्या ठिकाणी उद्या रात्री ९ ते १० दरम्यान आरती करून प्रार्थना करावी, अशी विनंती समन्वय समितीने केली आहे.

### अमरावतीजवळ अपघातात तीन ठार

अमरावती, ता. २६ - येथील नवसारी छंगपूर फाट्याजवळ आज सकाळी ट्रक आणि मोटार यांच्यात जोरदार टक्कर झाली. या अपघातात तीन जण जागीच ठार झाले आहेत. हे सर्वजण धार्मिक कार्यक्रम उरकून अमरावतीकडे मोटारीतून येत असताना हा अपघात झाला. मोहमंद असीफ (४०), सुखीयान कुरेशी (१०) मोहंमद हरुन (३५) अशी अपघातात मृत्यू पावलेल्या प्रवाशांची नावे आहेत.

### गुलबर्ग्याचे तापमान ४० अंशावर

बंगलूरू, ता. २६ - मार्च महिन्यातच पारा ४० अंशावरती चढला असून येथील नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत. कर्नाटकातील गुलबर्गा व बेळारीचे तापमान ४०.३ अंशावर पोहोचले आहे. देशात अन्यत्रही तापमान वेगाने वाढते आहे.

## दु:खाचा महाकवी हरपला

## कवी ग्रेस यांचे पुण्यात निधन



मुंबई, सोमवार - नवकवींच्या दुसऱ्या पिढीतील अग्रणी, ज्येष्ठ कवी माणिक सीताराम गोडघाटे ऊर्फ कवी ग्रेस यांचे आज पुण्यात निधन झाले. पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्यांनी अंतिम श्वास घेतला. गेली काही वर्षे ते कर्करोगाने आजारी होते. मृत्युसमयी ते ७५ वर्षांचे होते. अलीकडेच त्यांच्या 'वाऱ्याने हलते रान' या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला होता. त्यांच्या मागे दोन मुली व एक मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे साहित्य विश्वात शोककळा पसरली आहे. अनेक मान्यवरांनी दु:ख व्यक्त केले.

ज्या काळात मराठी कविता छंदाच्या बंधनातून मोकळी होत गद्यप्राय होत गेली त्या काळात कवी ग्रेस यांनी छंदबद्ध कवितेचा एक अखंड प्रवाह वाहता ठेवला. ४५ वर्षे मराठी रसिकांना त्यांची नादमय कविता वेडावत राहिली. कवी ग्रेस यांच्या कवितेवर नेहमीच दुर्बोधतेचा आरोप करण्यात आला. तो खराही होता. पण ग्रेस यांनी त्याची कधी पर्वा केली नाही. कर्णाची कवचकुंडले तशी माझ्या कवितेची दुर्बोधता असे ते म्हणत असत. लोककथा, पुराणकथा, मिथककथा, रामायण, महाभारतातले संदर्भ यांनी समृद्ध असलेली ग्रेस यांची कविता समीक्षकांनाही चकवा देत राहिली. मात्र तरीही 'ती गेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता...' 'भय इथले संपत नाही...' सारख्या त्यांच्या कविता जनमानसावर मोहिनी घालत राहिल्या आहेत.

पुढील मजकूर पान ४ वर

### भायखळ्यातील इमारतीला आग

मुंबई, सोमवार- भायखळ्याच्या राणीबागेजवळील ससेक्स इंडस्ट्रियल इस्टेटसमोरील 'दुर्वांकुर' या सात मजली इमारतीला आज दुपारी बाराच्या सुमारास आग लागली. या आगीत काही रहिवासी असल्याचे सांगण्यात आल्याने अग्निशमन दलाने एकच धावपळ केली. त्यांनी त्वरित आग आटोक्यात आणली. या आगीत कुठचीही जीवितहानी झाली नाही.

## नाशिकच्या शहरी भागात बिबट्याचा धुमाकूळ!

## गजानन कॉलनीतील सहाजण जखमी



नाशिक, ता. २६ - पाणी पिण्याच्या निमित्ताने भटकणारा बिबट्या रस्ता चुकल्याने तो थेट नागरी वस्तीतच घुसला. ही खळबळजनक घटना सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास पंचवटी परिसरातील गजानन कॉलनीत घडली. बिबट्याच्या हल्ल्यात सहाजण जखमी झाले आहेत. या घटनेमुळे गजानन कॉलनीतील नागरिकांची एकच पळापळ झाली. ज्या बंगल्यात बिबट्या घुसला, त्या कुटुंबियांनी कसेबसे घराबाहेर पळत आपली सुटका करून घेतली. कॉलनीतील नागरिकांनी प्रसंगावधान राखत बंगल्याची बाहेरून कडी लावून बिबट्याला आत कोंडून ठेवले. खिडकीवाटे भुलीचे इंजेक्शन देत वन खात्याच्या पथकाने पाच तास अथक परिश्रम करून अखेर बिबट्याला जेरबंद केले. गजानन कॉलनीच्या जवळच म्हसरूळ आणि बोरगड परिसर आहे. त्या परिसरात जंगल असून यापूर्वी अनेकांना येथे बिबट्याचे दर्शन झालेले आहे. उन्हाळ्यात या बिबट्यांना पाणी पिण्यासाठी भटकंती करावी लागते. या भटकंतीतच आज हा बिबट्या वाट चुकत थेट गजानन कॉलनीत घुसला. या दरम्यान रस्त्याने सैरवैर पळत येत असतानाच

पुढील मजकूर पान ४ वर

## मुंबईतील सराफांचा आज दादरमध्ये मोर्चा

## एक्साईज कायद्याला कडाडून विरोध

मुंबई, सोमवार- केंद्रीय अर्थसंकल्पात सराफांवर लावलेल्या 'एक्साईज ड्युटी'मुळे आणि एक्साईज कायद्यामुळे देशभरातील सोन्या-चांदीच्या दागिन्यांचे विक्रेते हवालदिल झाले आहेत. यापूर्वी त्यांनी देशभर तीन दिवसांचा कडक बंदही पाळला होता. उद्या मंगळवारी २७ मार्च रोजी संध्याकाळी ७ वाजता दादर, मुंबई उपनगरीय सराफी संघटनेच्या वतीने दादरच्या शिवाजी पार्कवरून सराफांचा मोर्चा निघणार आहे. हा मोर्चा सिद्धिविनायक मंदिरापर्यंत जाऊन पुन्हा दादरभर फिरणार आहे. या मोर्चात भोईवाडा, ठाणे, गिरगाव व डोंबिवलीच्या सराफी असोसिएशन सामील होणार आहेत. असे सराफी संघटनेचे पदाधिकारी अजित पेंडूरकर यांनी कळविले आहे.

मुंबई- ठाण्यातील सराफांचा सोन्यावरील वाढवलेल्या आयात कराला विरोध नाही. त्यांचा एक्साईज ड्युटीला व एक्साईज कायद्याला विरोध आहे. एक लाखाला ३०० रुपये भरायचे आणि वर एक्साईज अधिकाऱ्यांचा छळ सहन करायचा, त्यांना हप्ते द्यायचे हे सराफांना नको आहे. एक्साईज कायदा हा कारखान्यांना लागू असताना तो दुकानांना का लावता? हा सराफांचा सवाल आहे. त्यांना एक्साईज कायद्याचा जाच नको आहे. म्हणूनच हा मोर्चा आहे.



## गुजरात कच्छ वाळवंटात स्थापन उंटाच्या दुधाची 'सरहद्द डेअरी!'

अहमदाबाद, ता. २६ - लघु उद्योगांना प्राधान्य देऊन आर्थिक स्वावलंबनाच्या वाटेने गुजरात राज्याची दौड सुरू झाली आहे. अमूलच्या अपूर्व यशानंतर गुजरात दूध मार्केटिंग महासंघाप्रमाणे आता कच्छच्या वाळवंटात उंटाच्या दुधाचे संकलन, प्रक्रिया आणि विक्री करण्यासाठी कच्छ जिल्हा सहकारी दूध महासंघाच्या अंतर्गत सरहद्द डेअरी सुरू करण्यात येणार आहे.

राज्य सरकारने २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात यासाठी तरतूद केलेली आहे. उंटाचे दूध हे पोषक असते, पचण्यास हलके असते आणि त्यात फॅट कमी असतात. यामुळे हे दूध आरोग्यास उपयुक्त आहे. सरहद्द डेअरीमार्फत उंटाच्या दुधाबरोबरच आईस्क्रीम व तांदळाची खीरही तयार केली जाईल.

कच्छ भागात उंटांच्या मालकांना मालधारी म्हणतात. पूवी वाहतुकीसाठी उंट विकून चांगली किंमत मिळायची. मात्र वाहने आल्यानंतर ही मिळकत कमी झाली. आता डेअरी उद्योग सुरू झाल्याने त्यांना आर्थिक आधार मिळणार आहे.

## आशिया कपवर बांगलादेशचा दावा

ढाका, ता. २६ - आशिया कपसाठी बांगलादेश-पाकिस्तान यांच्यात झालेल्या लढतीत पाक खेळाडूंनी रडीचा डाव खेळला. शेवटच्या ओव्हरमध्ये पाक गोलंदाज एहझाज चिमा जाणीवपूर्वक मोहंमददुल्लाच्या वाटेत आल्याचा आक्षेप घेतला आहे. शिवाय बांगलादेशने थेट आशिया कपवर दावा केला आहे. तो दावा मान्य झाल्यास पाकच्या हातून आशिया कप जाऊ शकतो. बांगलादेशला शेवटच्या ओव्हरमध्ये विजयासाठी ९ धावांची गरज होती. १ धाव घेताना चिमाने जाणीवपूर्वक मोहंददुल्लाची वाट अडविल्याचा आरोप बांगलादेश क्रिकेट बोर्डाने केला. ते आयसीसीचे दार ठोठावणार आहेत.

**शुभराशी - ३,४,७**

# अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या तरतुदी

(पान १ वरून चालू)

**उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांची विविध योजनांसाठी तरतूद**

### शेतकऱ्यांसाठी

❍शेतकऱ्यांच्या वीज सवलतीसाठी २०५० कोटींची तरतूद.
❍शेतकऱ्यांच्या वीज पंपांना वीज सवलत देण्यासाठी १८५ कोटींची तरतूद.
❍लघुपाटबंधारे योजनांसाठी ८० कोटींची तरतूद.
❍कोरडवाहू शेतीसाठी २०० कोटींच्या निधीची तरतूद.
❍राज्यात ३ हजार शेततळी बांधणार.
❍राज्यात १८ हजार विहिरी बांधणार.
❍शेतकऱ्यांच्या कर्जाच्या थकबाकीवरील व्याज माफ करणार.
❍राज्यातील १०० कृषी उत्पन्न बाजार समितीचे लिलाव संगणकीय पद्धतीने होणार.
❍खतांच्या साठवणुकीसाठी २० कोटी रुपयांची तरतूद.
❍शेतकऱ्यांसाठी पणन व्यवस्था.

### रस्ते व जलमार्ग

❍कोकण सागरकिनारी जेट्टी उभारण्यासाठी १६०० कोटी रुपये देणार.
❍राज्यातील जलवाहतुकीसाठी २५० कोटींची तरतूद.
❍मुंबई गेट वे ते नवी मुंबई जलवाहतुक सुरू करणार. त्यासाठी २३० कोटींची तरतूद.
❍रस्ते, रेल व जलवाहतुकीसाठी ६०० कोटींची तरतूद.
❍राज्यातील रस्ते विकासासाठी २८९९ कोटींची तरतूद.
❍राज्यात ७८१० किलोमीटर लांबीचे रस्ते तयार करणार.
❍राज्यात यशवंतराव चव्हाण ग्राम सडक योजना सुरू करून छोट्या गावांना रस्त्यांनी जोडण्याची योजना. त्यासाठी १०० कोटींची तरतूद.
❍नागपूर-धुळे मार्ग चौपदरी करणार.
❍विमानतळांसाठी विशेष निधी देणार.
❍राज्यात ११ मार्ग, ८ उड्डाणपूल व ५ रेल्वे मार्ग प्रस्तावित.
❍राज्यातील पर्यटन विकासासाठी २२८ कोटींची तरतूद.

### शिक्षण व आरोग्य

❍राज्यातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी १२३० कोटींची तरतूद.
❍राज्यात मिड-डे मिल योजनेसाठी १५३४ कोटींची तरतूद.
❍राज्यात आपत्कालिन आरोग्य योजना सुरू करणार. या योजनेचा फायदा वाहन अपघात घडणाऱ्यांना तत्काळ मिळू शकेल. त्यासाठी ७६ कोटींची तरतूद.
❍राज्यात अंगणवाडींच्या बांधकामांसाठी १६४ कोटींची तरतूद.
❍राज्यात अलिबाग, नंदुरबार, सातारा व मुंबई येथे ४ नवीन वैद्यकीय महाविद्यालये उभारणार.
❍रयत शिक्षण संस्थेला ५ कोटींचा निधी देणार.
❍मुंबईतील जे.जे. रुग्णालयाचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल बनविण्यासाठी ६३० कोटी रुपये देणार.

### ग्रामविकास व ऊर्जा क्षेत्र

❍राज्यात ११०० मेगावॅट वीज निर्मितीसाठी १५०० कोटी रुपयांची तरतूद.
❍अपारंपरीक ऊर्जेसाठी ७५ कोटींची तरतूद.
❍ग्रामस्वच्छतेसाठी ४५ कोटी रुपयांची तरतूद.
❍सांडपाणी व्यवस्थापनासाठी १०३ कोटींची तरतूद.
❍शिधावाटप योजनेंतर्गत तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी विकत घेता येईल.
❍राज्यातील जिल्हा विकास आराखड्यासाठी ४९५० कोटी रुपयांची तरतूद.

### आदिवासी विकास योजना

❍नक्षलग्रस्त भागात औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरू करणार.
❍गोंदिया व गडचिरोली भागात आयटीआय कॉलेज उभारणार.
❍६ आदिवासी जिल्ह्यांमध्ये ६०० पाळणाघरे बांधणार.
❍आदिवासींना घरे बांधून देणार.
❍आश्रमशाळांसाठी ४०० कोटींची तरतूद.
❍वनसंवर्धनासाठी ९ कोटी रुपयांची तरतूद.

### गृहविभागासाठी तरतूद

❍राज्यातील पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी व शस्त्रे आणि वाहन खरेदी करण्यासाठी १५६ कोटींची तरतूद.
❍पोलिसांच्या घरांसाठी १३० कोटींची तरतूद.
❍पोलिसांच्या घरांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक ती तरतूद करण्यात येईल.
❍राज्यात १०० ठिकाणी जलदगती न्यायालये.
❍पुढच्या ५ महिन्यांत न्यायालये सुरू करणार.

### मराठी भाषा विकास

मराठी भाषा विभागाला गेले सहा महिने अध्यक्ष नाही. न्या. चपळगावकर यांनी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त आहे. तरीही भाषा भवन उभारण्याची बतावणी करण्यात येत आहे.
❍मराठी भाषा वृद्धीसाठी 'मराठी भाषा भवन' उभारणार.
❍मराठी भाषा विकासासाठी १५ कोटी देणार.
❍सीमा भागातील मराठी संवर्धनासाठी ५ कोटी रुपये देणार.
❍दुर्मिळ मराठी पुस्तके संगणकावर आणणार.
❍भीमसेन जोशींच्या नावाने शिष्यवृत्ती व पुरस्कार देणार.

### मुंबईकरांना काय मिळाले?

❍मुंबईतील पायाभूत सुविधांसाठी ७१० कोटी रुपयांची तरतूद.
❍मुंबई परिवहन योजना टप्पा -२ साठी ३५० कोटींची तरतूद.
❍मुंबईकरांसाठी ७५ हजार नवीन घरे बांधणार.
❍शहरी गरिबांच्या गृह योजनांसाठी ९६७ कोटींची तरतूद.
❍गरिबांना ३ महिन्यांचे धान्य एकाचवेळी घेता येईल.

## किड्यामुंग्यासारखे आयुष्य जगण्यापेक्षा माणूस म्हणून जगा

सिंधुदुर्ग, ता. २६ - ज्या समाजात जन्मलात त्या समाजाचा अभिमान बाळगा, किड्यामुंग्यांसारखे आयुष्य जगण्यापेक्षा माणूस म्हणून जगा, असे आवाहन करून अजूनही अस्पृश्यता संपलेली नाही, ती फाईलमध्ये दडून बसली आहे. व्यक्तीच्या आडनावावरून ती पुढे येते आणि प्रगतीला अडसर बनते, असे प्रतिपादन सिंधुदुर्ग जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रोहिदास वाघमारे यांनी केले. ते सिंधुदुर्गनगरी येथील आंतरराज्यीय चर्मकार समाजोन्नती मंडळाच्या वधूवर स्नेहमेळाव्यात बोलत होते.

मेळाव्यात उत्स्फूर्त रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. वधू-वर मेळाव्याचे उद्घाटन दीप प्रज्वलनाने डॉ. रोहिदास वाघमारे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी वधू-वरांना नैतिकता बघा, सोनं-नाणं, धन संपत्ती बघू नका, शरीराबरोबर मनाने निरोगी असणारा जीवनसाथी निवडा असा कानमंत्र दिला.

सिंधुदुर्गनगरी येथील अल्प बचत हॉलमध्ये आयोजित या वधू-वर मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्य चर्मकारी उन्नती मंडळाचे अध्यक्ष रघुनाथ मोरे, सिंधुदुर्ग जिल्हा चर्मकार उन्नती मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी मनोहर आंबेरकर, सिंधुदुर्ग बँकेचे संचालक तथा दलितमित्र पुरस्कार विजेते आत्माराम ओटवणेकर आदी उपस्थित होते.

## कामोठ्यात घरफोडी १० लाखांचा ऐवज लुटला

नवी मुंबई, ता.२६ - बंद घराचा दरवाजा तोडून अज्ञात चोरट्यांनी रोख रकमेसह घरातील दागिने आदी सुमारे १० लाखांपेक्षा अधिक किमतीचा ऐवज लुटून नेल्याची खळबळजनक घटना कामोठे येथे उघडकीस आली आहे.

कामोठे, सेक्टर११ मधील कृष्णकूंज सोसायटीत राहणाऱ्या फिर्यादी राजेश पाटीलला १८ मार्च रोजी आपल्या नातेवाईकांसह अलिबाग येथील गावी गेला होता. याकाळात घर बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलुप तोडून आत प्रवेश केला आणि कपाटातील सहा लाखांची रोकड, साडेचार लाख रुपये किमतीचे दागिने असा १० लाखांपेक्षा अधिक किमतीचा ऐवज लुटून नेला. रविवारी सकाळी राजेश पाटील पून्हा कामोठे येथे परत आले असता त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आले. याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात घरफोडीची तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत घरफोडी, लूटमारीसारख्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. या घटनांना रोखण्यास पोलिसांनाही अपयश येत असल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीची भावना पसरली आहे.

## पोलीस उपनिरीक्षक प्रशांत देसाई यांचे गडचिरोलीत अपघाती निधन

कराड, ता. २६ - गडचिरोली येथे पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असलेले सातारा येथील रहिवासी प्रशांत वसंत देसाई (२७), रा. जयमल्हार हौसिंग सोसायटी, सदरबझार, सातारा यांचे तेलगंना येथे कर्तव्य बजावत असताना अपघाती निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर माहुली येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

गडचिरोलीमधील पूरखेडा ते मालेवाडा रस्त्यावर तेलगंना येथे विशेष अभियान पथकामार्फत सुरू असलेल्या कारवाईनंतर हेडक्वॉर्टरला जात असताना पोलीसव्हॅन आणि मोटारसायकल यांच्यात शनिवारी दुपारी दोन वाजता अपघात झाला. या अपघातात पोलीस उपनिरीक्षक प्रशांत देसाई यांचा मृत्यू झाला. या अपघातामध्ये मोटारसायकलवरील एकजण व पोलीस व्हॅनमधील तीनजण जखमी झाले आहेत.

प्रशांत देसाई यांच्या निधनाचे वृत्त साताऱ्यात कळताच त्यांच्या कुटुंबावर शोककळा पसरली. त्यांचे पार्थिव साताऱ्यात आणल्यानंतर परिसरातील लोकांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. नंतर त्यांच्या पार्थिवावर माहुली येथील स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. सातारा पोलीस दलाच्यावतीने हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक (गृह) मारुतराव डफळे, पोलीस निरीक्षक सीताराम मोरे, पोलीस निरीक्षक दयानंद ढेमे, वायरलेसचे पोलीस निरीक्षक पवार, आदी उपस्थित होते. प्रशांत देसाई यांच्या पश्चात आई नंदा देसाई, दोन भाऊ प्रमोद देसाई, प्रवीण देसाई, बहीण स्वप्ना देसाई असा परिवार आहे. प्रमोद देसाई व स्वप्ना हे दोघे सातारा पोलीस दलात कार्यरत आहेत.

## नाशिकच्या शहरी भागात बिबट्याचा धुमाकूळ!

(पान १ वरून चालू)

या बिबट्याने बाबू आहेर, गौरव देवरे आणि पाच तरूणांवर पंजाने हल्ला करत त्यांना जखमी केले होते. बाळकृष्ण शेलार यांच्या घरातील लोक चहा-पाणी घेत असतानाच हा बिबट्या उघड्या दरवाजातून आत घुसला. बिबट्याला पाहून शेलार कुटूबियांची त-त, फ-फच उडाली. अशाही परिस्थितीत धीर राखत शेलार कुटुंबिय घराबाहेर पळाले. या दरम्यान हल्ला करत बिबट्याने संभाजी शेलार या तरूणाला जखमी केले. बिबट्या घुसल्याची बातमी कॉलनीत वाऱ्यासारखी पसरली. काही जागृक नागरिकांनी प्रसंगावधान राखत शेलार यांच्या बंगल्याची बाहेरून कडी लावत बिबट्याला आत कोंडून ठेवले. या घटनेची माहिती मिळताच पंचवटी पोलिसांनी तसेच वनखात्याच्या पथकाने तातडीने गजानन कॉलनीकडे धाव घेतली. वनखात्याच्या पथकाने खिडकीवाटे बिबट्याला भुलीचे इंजेक्शन दिले. बिबट्या बेशुध्द होताच वनखात्याच्या पथकाने त्याला जेरबंद केले. पाच तासानंतर हे थरारनाट्य संपताच नागरिकांनी सुटकेला निःश्वास सोडला.

## मिक्सरमध्ये हाताचे बोट गेल्याने जखमी

**सिंधुदुर्ग, ता. २६- मिक्सरमध्ये मसाला वाटण करताना हाताचे बोट मिक्सरमध्ये गेल्याने बावळाट येथील सत्यवती आत्माराम परब ही महिला गंभीर जखमी झाली.**

**तिला तातडीने सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असून तिच्यावर डॉ. देशपांडे अधिक उपचार करीत आहेत. सत्यवती ही दुपारच्या जेवणासाठी मसाला इलेक्ट्रिक मिक्सरमध्ये वाटण करीत असताना डाव्या हाताचे बोट चालत्या मिक्सरमध्ये गेल्याने गंभीर जखमी झाले.**

## दु:खाचा महाकवी हरपला

(पान १ वरून चालू)

ग्रेस यांचा जन्म १० मे १९३७ रोजी नागपूरमध्ये झाला. १९६७ साली त्यांचा 'संध्याकाळच्या कविता' हा संग्रह प्रकाशित झाला आणि मराठी कवितेत एक वेगळाच प्रवाह वाहता झाला. गेली चार-साडेचार दशके तो अखंड खळाळत राहिला.

कवितेसोबत त्यांनी ललितलेखही लिहिले. कवितेइतकेच त्यांचे ललितलेखही तरल आणि संदर्भसंपन्न आहेत. संध्याकाळच्या कविता (१९६७), राजपुत्र आणि डार्लिंग (१९७४), चंद्रमाधवीचे प्रदेश (१९७७), सांध्यपर्वाची वैष्णवी (१९९५), सांजभयाची साजणी (२००६) हे कवितासंग्रह आणि चर्चबेल (१९७४), मितवा (१९८७), संध्यामग्न पुरुषाची लक्षणे (२०००), मृगजळाचे बांधकाम (२००३), वाऱ्याने हलते रान (२००८) आणि कावळे उडाले स्वामी (२०१०) हे ललितसंग्रह ही त्यांची साहित्यसंपदा मराठी साहित्यात स्वत:चे अढळ स्थान कमवून आहे.

कवी ग्रेस स्वत:चा उल्लेख 'दु:खाचा महाकवी' असा करीत असत. त्यांच्या एका कवितेत त्यांनी - 'मी महाकवी दु:खाचा प्राचीन नदीपरी खोल, दगडाचे माझ्या हाती वेगाने होते फूल' असे म्हटले आहे. विलक्षण आत्मविश्वासाने व्यक्त होणारी त्यांची कविता कळली किती हा प्रश्न असला तरी ती लाखो रसिकांना लोभावत, वेडावत राहिली, पुन्हा पुन्हा मोहवीत राहिली आणि पुढे अनंत काळ मोहवत राहील यात शंका नाही.


फॉर्म क्र. 23 नियम 20 (3)

**भारत सरकार**
अर्थ मंत्रालय, अर्थ सेवा विभाग
**मुंबई डेट रिकव्हरी ट्रिब्युनल नं. 3**
6 वा मजला, सिंदिया हाऊस, नरोत्तम मोरारजी मार्ग, एल अँड टी हाउसच्या समोर, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई - 400038
दूरध्वनी 22665473 फॅक्स 22665473

**समन्स** इएक्स -09
ओ. ए. क्र. 2011चा 282
**आयसीआयसीआय बँक लिमिटेड** अर्जदार
विरुद्ध
**राजेंद्र मारुतराव पाटील प्रतिवादी** यांच्यामध्ये

प्रति,
डी. 1) **राजेंद्र मारुतराव पाटील**
904 बी विंग, सिल्व्हर लिंक बिल्डिंग,
हिरानंदानी इस्टेट, घोडबंदर रोड,
ठाणे (पूर्व) - 4000607

ज्याअर्थी वर उल्लेखलेल्या अर्जदाराने या न्यायाधिकरणासमोर वर उल्लेखिलेला अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी नेहमीच्या पद्धतीने समन्स पाठविणे शक्य झाले नाही आणि ज्याअर्थी पर्यायी सेवेच्या अर्जाला न्यायाधिकरणाने मान्यता दिली.

तुम्हाला आदेश देण्यात येत आहे की तुम्ही न्यायाधिकरणासमोर 09.04.2012 ला सकाळी 11.00 वाजता व्यक्तिश: किंवा वकिला (ॲडव्होकेट) मार्फत हजर व्हा आणि लिखित विवरण (रिटन स्टेटमेंट)/म्हणणे दाखल करा आणि विनंती केलेले अनुतोष (रिलीफ्स) कां मान्य करु नयेत याचे कारण द्या.

याची दखल घ्या की असे केले नाही तर तुमच्या अनुपस्थितित अर्जाची सुनावणी होईल आणि त्यावर निर्णय होईल.

19 डिसेंबर 2011 रोजी न्यायाधिकरणाच्या मोहोरखाली आणि हाताने दिले

**निबंधक 1/सी**
**एमडीआरटी -III**


## हिंदू जनजागृती समितीचे जोरदार धरणे आंदोलन

कोल्हापूर, ता. २६ - महाराष्ट्रात नरबळी, अन्य अमानवीय व अनिष्ट अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध व त्यांचे समूळ उच्चाटन अधिनियम २०११ रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी आज हिंदू जनजागृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणात आले.

देव, धर्म न मानणाऱ्या नास्तिकवादी आणि नक्षलवादी चळवळीशी संबंध असलेल्या संघटनांच्या दबावाखाली येवून महाराष्ट्र शासन अंधश्रद्धा निर्मूलन कायदा करू पाहात आहेत. परंतु त्याला सर्व धार्मिक संघटना, संस्था, संप्रदाय यांचा प्रखर विरोध आहे. या कायद्याच्या बंधनामुळे सर्व धर्माच्या श्रद्धा, प्रथा, परंपरा मोडीत निघणार आहेत. पोलिसांनासुद्धा या कायद्याची अंमलबजावणी करता येणार नाही, अशा संदिग्ध व चुकीच्या पद्धतीने हा कायदा तयार करण्यात आल्याचे नमूद करून हिंदू जनजागृतीच्या वतीने निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सुपूर्द करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, तीव्र विरोधामुळे २००५ सालात महाराष्ट्र जादूटोणा, अनिष्ट आणि अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन अधिनियमाच्या नावाने शासनाने कायदा करण्याचा प्रयत्न केला. परंतु ते विधेयक घटनाबाह्य आणि धार्मिक बाबींवर बंदी आणणारे असल्याने सुधारणेसाठी संयुक्त चिकित्सा समितीकडे विधी मंडळाने पाठविले आहे. शेवटी तीव्र विरोधामुळे ते विधेयक २००९ मध्ये रद्द झाले. आता पुन्हा त्याच विधेयकाचे नाव बदले आहे. या नव्या नावाने पुन्हा शासनाने हे विधेयक २०११ मध्ये विधानसभेत मांडले आहे.

## विक्रोळीतील सूर्यनगर येथे साईमंदिरात साईभंडारा

मुंबई, सोमवार - विक्रोळी पश्चिमेतील सूर्यनगर येथील ओम साई श्रद्धासेवा ट्रस्टतर्फे शिवाजी चौक येथील साई मंदिरात शुक्रवार दि. ३० मार्च ते रविवार दि. १ एप्रिल पर्यंत ३ दिवसांचा साई भंडारा व साई चरित्राचे अखंड पारायण आयोजित करण्यात आले आहे.

३० मार्चला साई चरित्रपोथीचे अखंड पारायण होईल, २१ मार्चला सायंकाळी ४ वाजता साईंच्या पालखीचे पूजन व पालखीची भव्य मिरवणूक निघेल. १ एप्रिल रोजी सायंकाळी ४ ते रात्री ११ पर्यंत साईभंडाऱ्याचे आयोजन केले आहे. तरी भाविकांनी याचा लाभ घ्यावा, अशी विनंती सेक्रेटरी विश्वनाथ घाडी यांनी केली आहे.

## ५ एप्रिल रोजी माणगाव तालुक्यात श्री भैरवनाथ भवानी, जोगेश्वरी यात्रा

माणगाव, ता. २६ - सालाबादप्रमाणे यंदाही रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथे बुधवार दि. ४ एप्रिल २०१२ रोजी प्रदोषकाळी श्री भैरवनाथ देवाची लाट जंगलातून भैरवनाथ मंदिराजवळ रात्री येईल. त्यानंतर श्री भैरवनाथ भवानी जोगेश्वरी यात्रा गुरुवार ता. ५ एप्रिल २०१२ रोजी चतुर्दशी या दिवशी सुरू होईल. सायंकाळी ४ वाजता लाट बगांडावरती फिरेल व त्याच दिवशी श्री भैरवनाथ देवाची यात्रा भरेल. तरी सर्व भाविकांनी या दर्शनाचा लाभ घ्यावा, असे वतनदार सालकरी रविंद्र भिकुराम पोवळे यांनी कळविले आहे.

## दशक्रिया विधी



आपणास कळविण्यात अत्यंत दुःख होते की, आमचे वडिल
**कै.श्री.अर्जुन बाबुराव शिंदे**
वय वर्ष ७१ यांचे सोमवार **दि. १९/०३/२०१२** रोजी दुखःद निधन झाले असून त्यांचा दशक्रिया विधी बुधवार **दि. २८/०३/२०१२** रोजी सकाळी ८.०० **वा.जागृतेश्वर शिव मंदिर तलाव, सेक्टर ७, वाशी, नवी मुंबई** येथे आयोजित करण्यात आला आहे. तरी आपण सर्व आप्तेष्ट व परिवार उपस्थित रहावे.

*** आपले दु:खांकित ***
श्री.पांडुरंग बाबुराव शिंदे श्री.भिवराज बाबुराव शिंदे श्री.रामचंद्र पांडुरंग शिंदे,
श्री.दिलीप अर्जुन शिंदे श्री. प्रदिप अर्जुन शिंदे श्री. राजेंद्र अर्जुन शिंदे
**समस्त शिंदे परिवार आणि आप्तेष्ट**


फॉर्म क्र. 23 नियम 20 (3)

**भारत सरकार**
अर्थ मंत्रालय, अर्थ सेवा विभाग
**मुंबई डेट रिकव्हरी ट्रिब्युनल नं. 3**
6 वा मजला, सिंदिया हाऊस, नरोत्तम मोरारजी मार्ग, एल अँड टी हाउसच्या समोर, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई - 400038
दूरध्वनी 22665473 फॅक्स 22665473

**समन्स** इएक्स -09
ओ. ए. क्र. 2011चा 282
**आयसीआयसीआय बँक लिमिटेड** अर्जदार
विरुद्ध
**सोनिया राकेश राजपुत प्रतिवादी** यांच्यामध्ये

प्रति,
डी - 1) **सोनिया राकेश राजपुत**
फ्लॅट क्र. 28 सी-8, गोदरेज हिल, बरवे व्हिलेज,
कल्याण-421301

ज्याअर्थी वर उल्लेखलेल्या अर्जदाराने या न्यायाधिकरणासमोर वर उल्लेखिलेला अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी नेहमीच्या पद्धतीने समन्स पाठविणे शक्य झाले नाही आणि ज्याअर्थी पर्यायी सेवेच्या अर्जाला न्यायाधिकरणाने मान्यता दिली.

तुम्हाला आदेश देण्यात येत आहे की तुम्ही न्यायाधिकरणासमोर 09.04.2012 ला सकाळी 11.00 वाजता व्यक्तिश: किंवा वकिला (ॲडव्होकेट) मार्फत हजर व्हा आणि लिखित विवरण (रिटन स्टेटमेंट)/म्हणणे दाखल करा आणि विनंती केलेले अनुतोष (रिलीफ्स) कां मान्य करु नयेत याचे कारण द्या.

याची दखल घ्या की असे केले नाही तर तुमच्या अनुपस्थितित अर्जाची सुनावणी होईल आणि त्यावर निर्णय होईल.

19 डिसेंबर 2011 रोजी न्यायाधिकरणाच्या मोहोरखाली आणि हाताने दिले

**निबंधक 1/सी**
**एमडीआरटी -III**

भारत सरकार पुरस्कृत संस्थेतर्फे
१०/१२ पास नापास मुला मुलींसाठी
पाहिजेत ट्रेनी नर्सिंग असिस्टंट
शिकताना महिन्याला कमवा २,०००/- ते ३,०००/-
100 % नोकरीची लेखी हमी
पास झाल्यावर रू. ५००/- ते ८००/-
प्रति दिवस कमवा
डॉ. गायकवाड इंस्टीट्यूट (स्थापना - १९९६)
२०३, आकांक्षा, प्लाझासमोर, सिलेक्शनवरती, दादर (वेस्ट), स्टेशनाजवळ २४३२६०७७ / २४३७०१५४
* मेघमहल, दत्तपाडा, बोरिवली (ईस्ट) २८७०६७३९
* ३१०, सुधांशु चेंबर्स, संतोष हॉटेलवरती, कल्याण (वेस्ट) ०२५१-२३०२९८६.
Website : www.drgaikwadinstitute.com

# नवाकाळ

मुंबई ■ मंगळवार, २७ मार्च, २०१२ ■ पान - ५

GOVT. OF INDIA (PROMOTED)
FOR 10/12 PASS/FAIL
100% JOB GUARANTEE
EARN & LEARN STIPEND 35 - 40,000
SUNDAY BATCHES AVAILABLE
DIRECT 2ND YR EXAM FOR EXPERIENCED STUDENT
PRACTICAL NURSING / DMLT
EARN PER DAY
RS. 500/- TO 800/-
X-RAY / ECG / OPTOMETRY
DIETICIAN / NATURECURE / SPA
DR. GAIKWAD INSTITUTE ( Estd - 1996 )
DADAR - 203, Akanksha, Opp. Plaza Ab Selection, Dadar (West). 24367386 / 24326077
BORIVALI - Megh Mahal, Dattapada, Borivali (E). 28706739 / 64287933
KALYAN - 310, Sudhanshu Chembers, Above Santosh Hotel, Kalyan (West). 0251-2302986
Website : www.drgaikwadinstitute.com

## सोसायट्यांकडून कर्जवसुली सुरू! शेतकरी अडचणीत

मनमाड, ता.२६- विविध कार्यकारी सोसायट्यांकडून शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जाची वसुली सुरू करण्यात आली असल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे जिल्हा बँकेने पीक कर्जफेड करण्यासाठी शेतकऱ्यांना दिलेली मुदत वाढवावी, अशी मागणी लातूर जि.प.चे माजी सदस्य राजेंद्र पवार यांनी केली आहे. पिकविलेल्या कांद्याला भाव नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात काही पडले नाही. आलेले पैसे खत व मजुरीमध्ये गेले आहेत. त्यामुळे जिल्हा बँकेने शेतकऱ्यांना काही सूट देऊन कर्ज भरण्याची मुदत वाढवून द्यावी, अशी मागणी शेतकरीवर्गातून केली जात आहे. शेतकऱ्यांच्या मागणीला पाठिंबा म्हणून या गटाचे माजी जि.प. सदस्य राजेंद्र पवार यांनी मागणी केली आहे.

## जलवाहिन्यांमध्ये गळती, जीर्ण पंपांमुळे देवगड तालुक्यात पाणीटंचाई

सिंधुदुर्ग, ता.२६- देवगड पाडाघर पाणी योजनेतील जलवाहिन्यांमध्ये गळती व जीर्ण पंप यामुळे पाण्याचा अपव्यय मोठ्याप्रमाणात होत असल्यामुळे तसेच दहिबांव अन्नपूर्णा योजनेतील फुटक्या जलवाहिन्यांमुळे देवगड मार्चमध्येच तहानलेले आहे. पाणी असून ही पाणीटंचाईचा या तालुक्याला सामना करावा लागत आहे.

देवगड तालुक्यातील दहिबांव अन्नपूर्णा नळपाणी योजनेतील सुमारे ३०-४०% पाणी फुटक्या नळ पाईप्समुळे वाहून जाते. तुळशीनगर, शिवनगर, साईनगर, आनंदवाडी, मधली बाजारपेठ, किल्ला भागामध्ये अनियमित पाणीपुरवठा होत आहे. गळतीची तात्पुरती दुरुस्ती न करता या जलवाहिन्यांची पुर्नबांधणी करण्याची गरज असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. देवगड तालुका पाणीटंचाईत असून पाण्यासाठी देवगडवासियांची पायपीट थांबावी यासाठी ठोस उपाययोजनांची गरज आहे.

## शासन संचालित महिला वसतीगृह एक तप बंद अवस्थेत!

मुंबई, सोमवार- अंधेरी (पश्चिम) येथे शासन अंगीकृत असलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळाचे 'सावली महिला वसतीगृह' गेले एक तप बंद आहे. परिणामी, बंद अवस्थेत असलेल्या या वसतीगृहाची तीन मजली इमारत अक्षरश: जर्जर झाली आहे.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मुंबईत नोकरीनिमित्त येणाऱ्या महिलांना राहण्यासाठी 'सावली महिला वसतीगृह' एकेकाळी आधार ठरत होते. मात्र महिला आर्थिक विकास महामंडळाने सन् २००० साली हे वसतीगृह बंद केले. परिणामी, गेली बारा वर्षे बंद अवस्थेत असलेल्या वसतीगृहाची तीन मजली इमारत धूळ खात पडून आहे.

याप्रकरणी वांद्र्यातील महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधला असता, तेथून असा खुलासा करण्यात आला की, या वसतीगृहाची इमारत म्हाडाच्या मालकीची आहे. आम्ही भाडेतत्त्वावर याचा वापर करत आहोत. मात्र इमारत धोकादायक झाल्याचे कारण देत म्हाडाने हे वसतीगृह बंद केले. ही इमारत पाडून त्या जागी नवीन सहा मजली इमारत बांधण्याची म्हाडाची योजना आहे. यानंतर पूर्ववत वसतीगृह याच ठिकाणी भविष्यात सुरू होईल. यासाठी आमचाही पाठपुरावा सुरू आहे.

## पुण्यात भैरवनाथ यात्रेत तरुणावर गोळीबार

पुणे, ता. २६ - भैरवनाथ यात्रेत एका तरुणावर गावठी पिस्तुलातून गोळीबार करण्यात आला. तरुणाच्या दंडाला गोळी छेदून गेली. जखमी तरुणावर उपचार सुरू आहेत. ही घटना रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास उंड्री गावात घडली. आकाश अनंता टकले (१७) रा. उंड्री असे बचावलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी आकाशचे काका सुभाष टकले (५०) यांनी हवेली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी नितीन सुभाष घुले, सचिन सुभाष घुले, वसंत रघुनाथ कड, निवृत्ती ज्ञानोबा बांदल, प्रवीण गोविंद आबनावे, आशिष मधुकर बांदल आणि गणेश सोपान घुले यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी सांगितले की, गावात भैरवनाथांची जत्रा सुरू आहे. आरोपींनी आकाश याच्यावर गोळी झाडली. ही गोळी दंडाला चाटून गेली. जखमी आकाशला रुग्णालयात दाखल करण्यात आले असून आरोपी पसार झाले आहेत.

## दरोडेखोरांच्या हिटलीस्टवर 'रायगड' पोलिसांसाठी एक मोठं आव्हान!

महाड, ता.२६- रायगड जिल्ह्यातील शेखाडी गावात १९७२ मध्ये समुद्रामार्गे स्फोटकं उतरविल्याच्या घटनेनंतर आता तमाम भक्तांचे श्रद्धास्थान असलेले दिवेआगार येथील श्रीगणेशाची सुवर्णमूर्ती चोरून दरोडेखोरांनी रायगडलाच पुन्हा विशेष लक्ष केल्याचे चव्हाट्यावर आले आहे. रायगड पोलिसांसाठी हे एक मोठे आव्हान असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

सागरतट, गडकिल्ले, मोठमोठे औद्योगिक प्रकल्प आणि ऐतिहासिक वास्तूंनी सर्वश्रुत असलेले रायगड हे एक प्रमुख पर्यटनस्थळ गणले जाते. देश-विदेशातून अनेक पर्यटक या ठिकाणी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून सहभागी होत असतात. यातच काही विदेशी गुप्तहेरांची शक्यता वर्तविण्यात येत आहे. १९९२ मधील स्फोटक प्राप्ती प्रकरणानंतर दिवेआगर येथील श्री गणेशाच्या सुवर्णमूर्तीची चोरी ही निश्चितच सामान्य बाब नाही. महाड, पोलादपूर, दिवेआगर व इतर भागांतील घरफोडी,चोरी, दरोडे यांचे प्रमाण वाढले असतानाच आता दरोडे करताना सर्वसामान्यांवरील सशस्त्र रक्तरंजित हल्ले, निर्घृण हत्या अशा भयानक प्रकारांतही वाढ झाली आहे. यातच तपासकामातील अपयश कायद्यातील त्रुटी आणि तत्त्वशून्य राजकारणामुळे या गोष्टींना सर्वाधिक खतपाणी मिळत आहे.

तपास यंत्रणेचे प्रमुख माध्यम असलेली पोलीस यंत्रणा अधिक सक्षम व सुसज्ज करणे काळाची खरी गरज असताना त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. रायगडमधील अनेक तालुक्यात पोलिसांची प्रचंड कमतरता आहे. अपुऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांमुळे गस्त वाढविणे शक्य नसल्याची वास्तविकता असल्यानेच गावागावातील नागरिक गस्त घालत जागरण करीत असल्याचे विदारक चित्र आहे.

## पुणे मनपाची तिजोरी राष्ट्रवादीच्या हातात!

पुणे, ता. २६ - पुणे महानगरपालिका स्थायी समितीच्या अध्यक्षपदी अखेर राष्ट्रवादी काँग्रेसचे बाबुराव चांदेरे यांची निवड झाली. मनपाच्या तिजोरीच्या चाव्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या हातात आल्या आहेत. त्यामुळे मित्रपक्ष असलेल्या काँग्रेस पक्षाची अवस्था तोंड दाबून बुक्क्यांचा मार खावा, अशी झाली आहे. काँग्रेस पक्षाने स्थायी समितीच्या अध्यक्षपदावर दावा केला होता. या पार्श्वभूमीवर दोन्ही काँग्रेसच्या नेत्यांची बैठकही घेण्यात आली होती. मात्र या बैठकीत तोडगा निघाला नव्हता. त्यामुळे तिजोरीच्या चाव्या कोणाकडे जातात. याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतही आघाडीत बिघाडी झाली होती. त्यामुळे स्थायी समितीच्या निवडणुकीत चमत्कार घडेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होत होती.

## नवी मुंबईत रस्ते अपघातात २ ठार

नवी मुंबई, ता.२६ - नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत रविवारी झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांत २ जणांचा मृत्यू झाला.

कामोठे भागात राहणारी निर्मलाबाई घोळे (५८) ही महिला शनिवारी कळंबोली कॉलनी येथील नातेवाईकांकडे गेल्या होत्या. रविवारी सकाळी ६ च्या सुमारास आपल्या नातेवाईकांसह कामोठे सिग्नल येथे रस्ता ओलांडत होत्या. त्याचवेळी मुंबईहून पुण्याच्या दिशेने जाणारा टेम्पो सिग्नलवर अचानक ब्रेक लावून थांबला. यावेळी टेम्पो रस्त्यावर पलटी झाला आणि त्या खाली निर्मलाबाई आल्या. या दुर्घटनेत निर्मलाबाई याचा मृत्यू झाला. अपघातानंतर टेम्पोचा चालक फरार झाला. दुसऱ्या घटनेत कळंबोली येथील स्टील मार्केट परिसरात अज्ञात वाहनाने धडक दिल्यामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाला. सदर व्यक्तीची ओळख पटली नाही. याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## डॉ. गाडगीळ यांचा अहवाल जनतेसाठी खुला करण्याचे आदेश

सिंधुदुर्ग, ता. २६ - डॉ. माधव गाडगीळ यांचा अहवाल जनतेसाठी अधिकृतरीत्या खुला करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. पश्चिम घाटातील सहा जिल्ह्यांना डॉ. गाडगीळ यांच्या अहवालावर प्रत्येक जिल्हा कार्यवाही करणार आहे. याबाबत २८ मार्चपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश न्यायालशाने दिले आहेत. पश्चिम घाटातील जैवविविधतेच्या अभ्यासासाठी नेमलेल्या डॉ. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालील अभ्यास समितीने पश्चिम घाटाचा सविस्त अहवाल बनवून तो ३१ ऑगस्ट २०११ रोजी केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाला सादर केला होता. परंतु शासनाने तो अहवाल खुला व लागू करण्यास टाळाटाळ केल्याने मुंबई येथील आवाज फाऊंडेशन व वनशक्ति पर्यावरणवादी संस्थांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्याचप्रमाणे डॉ. गाडगीळ समितीचा अहवाल जनतेसाठी खुला करून तो त्वरित पश्चिम घाटात लागू करण्यात यावा व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व प्रदूषणकारी प्रकल्पांना कायमची बंदी आणून डॉ. गाडगीळ समितीने शिफारस केल्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पश्चिम घाटाचा पट्टा 'इको सिन्सिटिव्ह' म्हणून जाहीर करावा, अशी मागणीही याचिकाकर्त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात केली होती. त्यानुसार न्यायालयाने काही दिवसांपूर्वी डॉ. गाडगीळ समितीचा अहवाल याचिकाकर्त्यांना देऊन तो जनतेसाठी खुला करण्याचे आदेश दिले होते. डॉ. गाडगीळ समितीचा अहवाल दडपण्यासाठी अजूनही प्रयत्न सुरू आहेत. पश्चिम घाट व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यावरण प्रदूषणकारी प्रकल्पांपासून वाचवायचे असल्यास त्यासाठी न्यायालयीन लढाच योग्य ठरणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातून प्रदूषणकारी प्रकल्पांविरोधात आता लोकांना मोठ्याप्रमाणात जागरुक होणे गरजेचे आहे.

## खार सांताक्रूझच्या पाण्याची तक्रार वांद्र्याला घेऊन जावे लागते

मुंबई, सोमवार- सांताक्रूझ, खार (पूर्व) भागातील हजारो नागरिक प्रशासनाच्या कारभारावर संतप्त आहेत. कारण सांताक्रूझमध्ये पालिकेचे कार्यालय असताना पिण्याच्या पाण्याच्या तक्रारीबाबत वांद्र्याला जावे लागते. म्हणजे 'आम रामेश्वरी बंब सोमेश्वरी' असा प्रकार म्हणावा लागेल.

अधिक माहिती अशी की, सांताक्रूझ प्रभात कॉलनी येथे पालिकेची भव्य इमारत आहे. यामध्ये पाणी खात्याचे स्वतंत्र कार्यालय आहे. असे असताना गेल्या दोन वर्षांपासून येथील अधिकाऱ्यांनी नवीन फंडा शोधून काढला आहे. कमी दाबाने येणारे पिण्याचे पाणी, अपुरे अनियमित येणारे पाणी, नळांद्वारे येणारे घाण पाणी, पाणीटंचाई अशा तक्रारीसाठी स्थानिक नागरिकांना वांद्रे कलानगर येथे पालिकेच्या छोट्याशा कार्यालयात पाठविले जाते. आम्ही नवीन नळजोडण्या देतो. पाण्यासंदर्भात तक्रारी असतील तर वांद्र्याला जा! असे उत्तर अधिकाऱ्यांकडून दिले जात असल्याचे म्हणणे खार-सांताक्रूझ भागातील नागरिकांचे आहे.

सांताक्रूझमध्ये पालिकेचे जल विभागाचे कार्यालय असताना आम्हाला तक्रारी घेऊन वांद्र्याला का पाठविले जाते? असा सवाल करत येथील नागरिक म्हणाले, प्रशासनाने हा मनमानी कारभार न थांबविल्यास जनआंदोलन छेडावे लागेल. खार-सांताक्रूझ भागातील सर्वपक्षीय नगरसेवकांनीदेखील जनतेच्या आंदोलनाला पाठिंबा वरील मुद्यावर दिला पाहिजे.

## आढळा लाभक्षेत्रात डाळींब बागा पाण्याअभावी संकटात पाणी विकत घेण्याची शेतकऱ्यांवर वेळ



अकोले,ता.२६- अकोले (जि. नगर) तालुक्यातील आढळा परिसरातील मोठ्या प्रमाणावर असलेल्या 'डाळींब बागा' पाणीटंचाईने संकटात आल्या असून बहरात आलेल्या या डाळींब बागांसाठी शेतकऱ्यांवर पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. आढळा परिसरातील आढळा धरणाने अक्षरश: तळ गाठला आहे.

या धरण लाभक्षेत्रातील पिंपळगाव, निपाणी, वीरगांव, देवठाण, गणोरे या गाव परिसरात डाळिंबाचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढू लागले आहे. कांद्याचे घसरते भाव व भरमसाट उत्पादन खर्च यामुळे काही वर्षांपासून शेतकरी हमखास नगदी उत्पादन देणाऱ्या डाळींब पिकाकडे वळला आहे.

मात्र सध्या पाणीटंचाई सुरू असल्याने बहरत चाललेल्या या डाळींब बागा पाण्याअभावी संकटात सापडल्या आहेत. डाळींब पीक वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना अक्षरश: टँकरचा आधार घेऊन पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. ऐन बहरात आलेले हे डाळींब पीक जगविण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू आहे. अजून उन्हाळ्याचे तीन महिने कडक जाणार आहेत. आता येणारे हे तप्त महिने काढायचे कसे? याबाबत शेतकऱ्यांमध्ये तीव्र चिंता पसरली आहे.




बोनी कपूर, अनिल कपूर, संजय कपूर हे कपूर बंधू प्रसिद्ध निर्माते सुरिंदर कपूर यांचे चिरंजीव. वडिलांच्यानंतर मोठा भाऊ या नात्याने बोनीने निर्मितीची सूत्रे हाती घेतले. मोना कपूर ही बोनीची पहिली पत्नी. प्रत्यक्षात चित्रपटात काम केले नसले तरी चित्रपट निर्मितीच्या मागची बरीचशी सूत्रे तिच सांभाळत होती. बोनीने आजवर जेवढ्या म्हणून चित्रपटाची निर्मिती केली त्यात तिचा सहभाग होता. लोकप्रियता मिळवून असलेली 'रुप की राणी चोरों का राजा' आणि 'मिस्टर इंडिया' हे त्यापैकी काही चित्रपट की ज्या चित्रपटामध्ये अभिनेत्री श्रीदेवीचा सहभाग होता.हिंदी चित्रपटामध्ये श्रीदेवीला स्थिरता मिळण्याच्यादृष्टीने बोनीने केलेली धडपड श्रीदेवीला इतकी भावली की बोनी हा विवाहित असतानासुद्धा त्याच्याबरोबर पुनर्विवाह करण्याची तयारी दाखवली. श्रीदेवीचा हा निर्णय कपूर घराण्याला इतका घातक ठरला की संजय, अनिल कपूर अभिनेते या नात्याने बोनीबरोबर होते. श्रीदेवी आली आणि त्यांनी स्वतंत्र निर्मितीचा व्यवसाय सुरु केला. अर्थात याला कारणही श्रीदेवीच आहे. विवाहबद्ध झाल्यानंतर कामाचा ओघ कमी झाला. त्यामुळे तिने निर्मिती प्रक्रियेकडे लक्ष दिले. त्यासाठी स्वतःच्या नावात असलेली स्पेलिंगही बदलली. 'शक्ती' हा श्रीदेवीच्या निर्मितीतला चित्रपट होता. श्रीदेवी स्वतः कुटुंबात वर्चस्व निर्माण करते म्हणताना पहिली बायको मोना हिने रितसर घटस्फोट घेतला.ती स्वतंत्रपणे एका कंपनीसाठी सीईओ म्हणून काम करीत असली तरी मुळातच असलेला कॅन्सरचा आजार तो आणखीन बळावला. त्यामुळे तिचे निधन झाले. पण या निधनामुळे तिची इच्छा अधुरी राहिली. अर्जुन या तिच्या पुत्राला 'इश्कजादे' या चित्रपटात नायक म्हणून तिला पाहायचे होते.

## शासनाच्या दहा वर्षे रखडलेल्या सागरी प्रकल्पाला अखेर मुहूर्त सापडला

मुंबई, सोमवार - राज्य शासनाने दहा वर्षांपूर्वी घोषणा केलेल्या शिवडी-न्हावा-शेवा प्रकल्पाला अखेर मुहूर्त मिळाला. सन २०१३ मध्ये या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात होणार आहे, अशी माहिती एम.एम.आर.डी.ए. कार्यालयातून देण्यात आली.

तब्बल २२ किलोमीटरच्या शिवडी-न्हावा-शेवा सागरी मार्गाचे काम सन २००३ मध्ये सुरू होणार होते. पण हा प्रकल्प गेले १० वर्षे रेंगाळला होता. आता मात्र या प्रकल्पाला सरकारने पुन्हा संजीवनी देण्याचे ठरविले आहे. यासाठी केंद्र सरकार रुपये १६२५ कोटी व एमएमआरडीए १६२५ कोटी रुपये असा एकत्रित आर्थिक भार उचलून हा प्रकल्प उभा करण्याचे ठरविले आहे. मात्र या प्रकल्पाच्या कामाचा खर्च ३२ हजार कोटींनी वाढला असल्याचे सांगितले जात आहे. तसेच या प्रकल्पाच्या उभारणीला गेल्या दहा वर्षांच्या कालावधीत पर्यावरण विभागाकडून मंजुरी घेण्यास अपयश आले असल्याची कबुली देण्यात आली.

वरील सागरी मार्गाच्या प्रकल्पामुळे मुंबई, नवी मुंबई, जी.एन.पी.टी. परिसरातील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होईल, असा दावा एमएमआरडीएने केला आहे. आता सन २०१३ मध्ये सुरू होणाऱ्या या प्रकल्पाची एमएमआरडीएने संकल्पना मांडली आहे. सध्या या कामाचा आराखडा कागदावरच आहे.

## भूसंपादनासाठी शेतकऱ्यांची बाजू समजून घ्या

सिंधुदुर्ग, ता.२६-टोलनाका बांदा सटमटवाडी येथील भूसंपादनप्रकरणी शेतकऱ्यांना बाजू मांडण्याची संधी द्यावी, अशी मागणी प्रकल्पग्रस्त साईप्रसाद कल्याणकर यांनी सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी वीरेंद्र सिंह यांच्याकडे केली आहे. याबाबतचे लेखी निवेदन कल्याणकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले. बांदा येथील टोलनाक्याच्या भूसंपादन प्रक्रियेत अधिकाऱ्यांनी फक्त सातच मुद्यांचा विचार केला असल्याची माहितीही माहितीच्या अधिकारात प्राप्त झाली आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेस पळविले

भिवंडी, ता. २६ - लग्नाचे आमिष दाखवून एका २२ वर्षीय विवाहितेस फूस लावून पळवून नेल्याची घटना गायत्रीनगर येथे घडली आहे.

मनोज नागेपल्ली (२१) रा. कामतघर असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने ओळख निर्माण झालेल्या एका २२ वर्षीय विवाहितेस फूस लावून पळवून नेले. विवाहित महिलेने माहेरी जाते असे पतीला सांगून माहेर गाठले. तर वडिलांना मुंबईला मावशीकडे जाऊन येते, असे सांगून प्रियकर मनोज याच्यासोबत पलायन केले.

## घरगुती गॅसची अवैध वाहतूक तिघांनी झाली अटक

मनमाड, ता.२६- घरगुती गॅस सिलिंडरची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या तीनजणांना मनमाड पोलिसांनी ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केल्याने खळबळ उडाली आहे. सिलिंडरसह, सव्वासहा लाखांचा माल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुकीचा परवाना नसताना अवैधरित्या सिलिंडर वाहतूक करताना मालेगाव नाका पेट्रोलपंपासमोर हा प्रकार उघडकीस आला. विजय भीमराज पाटील, अनिल आहिरे, निखिल तेजवाणी या तिघांविरुद्ध पोलिसांनी जीवनावश्यक वस्तू कायदा कलमान्वये कारवाई करून अटक केली आहे. त्यांच्याकडून दोन रिक्षांसह एच.पी. कंपनीचे दहा सिलिंडर असा एकूण एक लाख १६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. ही कारवाई पो. उपअधीक्षक समाधान पवार यांना खबर मिळताच त्यांनी पो.नि. सी.डी. बनकर यांना सूचना देऊन ही कारवाई केली.

## स्कॉर्पिओ उलटून चालकाचा मृत्यू

सिंधुदुर्ग, ता. २६ - पर्यटन आटोपून पनवेलकडे परतत असताना गुरे रस्त्यावरून आडवी आल्याने ब्रेक लावताना झालेल्या अपघातात स्कॉर्पिओ उलटून भूषण जयवंत चौधरी (२७, रा. रायगड) हा जागीच ठार झाला आहे.

हा अपघात साळीस्ते येथील हॉटेल वनश्रीनजीक मुंबई-गोवा महामार्गावर घडला. अपघातात ७ जण गंभीर जखमी झाले असून एकाची प्रकृती गंभीर आहे. गंभीर जखमी तरुणाचे नाव प्रतीक मिनमिने (२२, रा. पनवेल) असे आहे. हे सर्वजण मालवण येथे पर्यटनासाठी आले होते. परतीच्या प्रवासात हा अपघात झाला.

## आचरे रामेश्वर मंदिरात रामनवमी उत्सव

मालवण, ता.२६-मालवणातील आचरे येथील इनामदार श्री देव रामेश्वर संस्थानचा रामनवमी उत्सव गुढीपाडवा ते रामनवमीपर्यंत शुक्रवार २३ मार्च ते रविवार १ एप्रिल या कालावधीत मोठ्या थाटात साजरा होत आहे.

या कालावधीत मंदिरात दररोज विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी १ एप्रिल रोजी रामनवमी उत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहून देव दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन इनामदार श्री देव रामेश्वर संस्थान कसबा आचरेतर्फे करण्यात आले आहे.

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा
संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
नवाकाळ
।। न मे भक्त: प्रणश्यति ।।
अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# अण्णांच्या आरोपांमुळे राजकीय उंदरांची पळापळ

राजकारण्यांच्या स्वार्थीपणामुळे देशहिताचा अक्षरश: बाजार मांडला गेला आहे. भ्रष्टाचाराने सगळा देश पोखरला जातोय. या भ्रष्टाचाराचे मूळ सध्याच्या राजकीय पद्धतीत आणि राजकारण्यांच्या प्रवृत्तीत आहे. सगळ्या क्षेत्रात या राजकीय उंदरांनी उच्छाद मांडल्यामुळेच देश पोखरला जातोय. राजकारण्यांच्या हातात सत्ता असते, पैसा असतो, गुंड-पुंडांची साथ-सोबत असते. या गोष्टींच्या जोरावर धमकावून ते केवळ सामान्य माणसांचाच नव्हे तर बड्या-बड्या वृत्तपत्रांचाही आवाज दाबू शकतात. अशा सर्व राजकीय दबावतंत्राला बळी न पडता या भ्रष्टाचारांच्या तोंडाला काळे फासण्याचे धैर्य सध्या फक्त एकटे अण्णा हजारेच दाखवू शकतात. दिल्लीत झालेल्या धरणे आंदोलनात त्यांनी जवळपास दोन डझन भ्रष्टाचारी केंद्रीय मंत्र्यांची जंत्रीच वाचून दाखविली. या मंत्र्यांविरुद्ध सरकारने कारवाई करावी अथवा देशभर जनजागृती आंदोलन सुरू करण्याचा इशारा अण्णांनी दिला आहे. अण्णांनी महाराष्ट्रातल्या तथाकथित बड्या नेत्यांची, मंत्र्यांचीही नावे घेतली. या मंत्र्यांविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप करताना त्यांच्याकडे किती पुरावे आहेत याची आम्हाला माहीत नाही. परंतु तशी ठोस माहिति असल्याशिवाय अण्णा हजारे आणि गटाने हे आरोप केलेले दिसत नाहीत. पुरावे नसतांना अण्णा जर आरोपांच्या फैरी झाडत असतील तर त्यांच्या धाडसाचे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. कारण आज राजकारण्यांनी समाजात अशी काही अघोषित हुकुमशाही निर्माण केली आहे की सामान्य माणूस या धटिंगणांच्या नादी लागू शकत नाही. राजकारण्यांनी निर्माण केलेल्या दहशतीमुळे सरकारी यंत्रणासुद्धा गुडघे टेकून रांगताना दिसतात. लोकप्रतिनिधी या शब्दाचा इतका खेळखंडोबा यापूर्वी कधीही झाला नव्हता. आमदार, खासदार विरोधी पक्षनेत्यांच्या दिमतीला सगळा सरकारी फौजफाटा एखाद्या गुलामासारखा धावपळ करतांना दिसतो, ही सगळी लोकशाहीची थट्टा आहे. लोकप्रतिनिधी नावाची पाटी वापरून दहशत निर्माण करण्याचा नवा राजकीय धंदा तेजीत सुरू आहे अशा या सराईत आणि पटाईत राजकीय भ्रष्टाचाऱ्यांविरुद्ध बोलण्याचे धाडस अण्णांनी दाखविल्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो!! कारण जनतेचा आवाज बुलंद करण्याचे व्रत आम्ही घेतले आहे. या देशातले राजकीय पक्ष भ्रष्टाचाराला विकले गेले असल्याने त्यातला एकही हरीचा लाल अण्णांच्या लढ्यात सहभागी होणार नाही, याची आम्हाला पूर्ण खात्री आहे.

### भाजपासुद्धा त्याच पंगतीत

खरे तर अण्णांनी थेट काही मंत्र्यांची नावे घेऊन त्यांना भ्रष्टाचारी ठरवले. हा त्यांच्या संघर्षातला सर्वात मोठा टप्पा आहे. एका अर्थी त्यांचे हे आरोप राजकीय भूकंप घडविणारे आहेत. अण्णांनी असे गौप्यस्फोट करणारे आरोप केल्यानंतर देशातल्या प्रमुख विरोधी पक्षांनी आणि स्वत:ला देशनिष्ठ म्हणवून घेणाऱ्या संघटनांनी अण्णांना जाहीर पाठिंबा द्यायला हवा. या भ्रष्ट केंद्रीय मंत्र्यांच्या हकालपट्टीची मागणी करायला हवी. परंतु भारतीय जनता पक्षासारखा पक्ष जो स्वत:ला स्वच्छ प्रतिमेची दवंडी पिटतो, त्यानेदेखील अण्णांचे या धाडसाबद्दल साधे अभिनंदन केले नाही. कारण त्या भ्रष्टाचाऱ्यांच्या यादीत भाजपाचे कर्नाटकातील माजी मुख्यमंत्री येडीयुरुप्पा यांचेही नाव आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे उद्या आपण सत्तेत आल्यावर हेच अण्णा आपल्या मंत्र्यांचाही भ्रष्टाचार उघड करतील ही भीती असल्याने अण्णांपासून चार हात लांब राहण्याची अक्कलहुशारी भाजपाने दाखवली परंतु भाजपाचे हे कातडी बचावू धोरण म्हणजे भ्रष्टाचाऱ्यांच्या जेवणावळीत स्वत: ताव मारण्यासारखे ठरते. भाजपातही भ्रष्टाचारी अनेक भुंगे असून ते या पक्षाच्या कमळाला पोखरत आहेत. हाच तर राजकीय स्वार्थ आहे. त्यामुळेच देश भ्रष्टाचाऱ्यांनी खरेदी केल्यासारखी परिस्थिती आहे.

### पुराव्यांशिवाय पुरून उरणार

गेले काही दिवस अण्णांचे आंदोलन शांत झाल्याने अनेक राजकारण्यांना आनंदाच्या उकळ्या फुटल्या होत्या. परंतु अण्णांचे वय आणि सतत उपोषण करण्यामुळे प्रकृतीवर होणारा परिणाम जर लक्षात घेतला तर त्यांनी काही दिवस विश्रांती घेणे आवश्यकच होते. याचा अर्थ त्यांनी लढा सोडून दिला नव्हता. सशक्त लोकपाल आणण्यासाठी ते अजून आग्रही आहेत. या भ्रष्टाचारी मंत्र्यांची जंत्री जाहीर करण्यामागे तसेच भक्कम कारणही आहे. वर्षानुवर्षे सत्तेत, राजकारणात राहून आपण स्वच्छ आहोत, असा प्रचार करणाऱ्यांना हजारे यांनी सणसणीत चपराक हाणली आहे. अशा भ्रष्टाचाऱ्यांच्या जीवावर देशाचा कधीही उद्धार होऊ शकत नाही आणि मग अशा भ्रष्टाचारात पुरलेल्या आणि देशहिताचं लोणचं घालणाऱ्यांना जाब विचारला पाहिजे यासाठी सशक्त लोकपालच कसा गरजेचा आहे हेच अण्णांनी आपल्या या मागणीतून दाखवून दिले. भ्रष्टाचाऱ्यांच्या टोळ्या जर इतक्या उजळ माथ्याने देशभर फिरत असतील. पांढरे डगले घालून भाषणांचे रतीब घालणार असतील तर त्यांची तोंडे भ्रष्टाचाराने कशी काळी आहेत, हे कोणीतरी सांगितले पाहिजे. त्यांचेच दात त्यांच्यात घशात घातले पाहिजेत. तरच लोकशाहीच्या कुडीत थोडीफार धुगधुगी राहील नाहीतर हे सगळे राजकीय भ्रष्टाचारांचे दूत लोकशाहीला चितेवर टाकण्यासाठी आसुसलेले आहेत. सगळे राजकीय पक्ष भ्रष्टाचाराचेच वंशज असल्याने त्यांच्याकडून कोणतीही अपेक्षा ठेवता येत नाही. मोठी वृत्तपत्रे थोडा राजकीय दबाव आला की त्या राजकारण्यांवरील आरोपाशी आमचे वृत्तपत्र सहमत नसल्याचे सांगून लोटांगण घालतात. अशा परिस्थितीत जर अण्णा हजारे पुराव्यांशिवाय भ्रष्टाचाऱ्यांना पुरून उरण्यासाठी सिद्ध झाले असतील तर त्यांच्या धाडसाबद्दल जाहीर आभारच मानले पाहिजेत.

# शेवटच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा विजय



**सेंट ल्युसिका, ता.२६- येथे झालेल्या पाच सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत शेवटच्या सामन्यात पाहुण्या ऑस्ट्रेलियाने ३० धावांनी विजय मिळवून या मालिकेत अखेर २-२ अशी बरोबरी साधली.**

उभय संघातील एक लढत टाय झाली होती. चौथा सामना यजमान वेस्ट इंडिजने जिंकून मालिकेत आघाडी घेतली होती. परंतु शेवटचा सामना मात्र त्यांनी गमाविल्यामुळे मालिका विजयाचे त्यांचे स्वप्न भंग पावले. प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाने ५० षटकात ९ बाद २८१ धावांची मजल मारली. सलामीवीर वॅटसन-वार्नर यांनी ऑस्ट्रेलियाला ११८ धावांची दमदार सलामी करून दिली. हे दोघे बाद झाल्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या फॉरेस्टनेदेखील ५३ धावांची छान खेळी केली. त्यामुळे ऑस्ट्रेलियाला मोठे लक्ष वेस्ट इंडिजसमोर विजयासाठी ठेवता आले. वेस्ट इंडिजतर्फे रसेलने सर्वाधिक ४ बळी घेतले.

रोशला ३ आणि नरीनला २ बळी मिळाले. २८२ धावांचा पाठलाग करताना इंडिजचा डाव ४७.२ षटकांत २५१ धावांतच गडगडला. कर्णधार सॅमीने ८४ धावांची झुंजार खेळी केली. परंतु इतर सहकाऱ्यांची साथ न मिळाल्यामुळे अखेर विंडीजला पराभव पत्करावा लागला. त्याने ५० चेंडू खेळताना ६ षटकार आणि ६ चौकारांची आतषबाजी केली. सलामीवीर बराथने ४२ धावा केल्या. तर गेल्या सामन्यात शतक काढणारा पोलार्ड ३३ धावांवर बाद झाला.

ऑस्ट्रेलियाचा अनुभवी गोलंदाज ब्रेटलीने सर्वाधिक ३ बळी घेऊन वेस्ट विंडीजची दाणादाण उडविली. मकाय, वॅटसन आणि दोहथीने प्रत्येकी २ बळी घेतले. कर्णधार सॅमीला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. तर मालिकावीराचा मान पोलार्डने मिळविला.

## इन्शुरन्स क्रिकेट स्पर्धा

मुंबई, सोमवार - येत्या २७ मार्च ते १३ एप्रिलदरम्यान दी ओरिएंटल फायर अॅण्ड जनरल इन्श्युरन्सच्या युनिट ज्युपिटर स्पोर्टस् क्लबच्या विद्यमाने तब्बल १० वर्षांनंतर पुन्हा एकदा इन्श्युरन्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. क्रॉस मैदानातील नॅशनल क्रिकेट क्लबच्या मैदानावर २७ मार्च रोजी स्पर्धेचे उद्‌घाटन पी.एस.के. राव यांच्या हस्ते होणार आहे. ८ संघ स्पर्धेत सहभागी होत असून त्यांची दोन गटांत विभागणी करण्यात आली आहे.

यजमान ओरिएटल इन्श्युरन्ससह न्यू इंडिया इंन्श्युरन्स, युनायटेड इंडिया इन्श्युरन्स, जनरल इन्श्युरन्स, एल.आय.सी., कॅनरा बँक, माझगाव डॉक आणि टाईम्स ऑफ इंडिया यांचा सहभाग आहे. १० एप्रिलला उपांत्य फेरीचे सामने होतील. तर १३ एप्रिलला अंतिम फेरीचा सामना होणार आहे. स्पर्धा सुरू करण्यासाठी ओरिएंटल इन्श्युरन्स जितेंद्र (जितू) इंगळे, डी.वाय. पाटील ग्रुपचे विजय पाटील यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली.

## राफेल नादालची आगेकूच



मिमाई, ता.२६- येथे सुरू असलेल्या मिमाई एटीपी आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेत स्पेनच्या राफेल नादालने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्याने चौथ्या फेरीच्या सामन्यात जेक प्रजासत्ताकाच्या रॅडेक स्टेपनेकचा ६-२, ६-२ असा सरळ दोन सेटमध्ये पराभव केला.

उभय संघात झालेल्या सहाही लढतींत राफाने बाजी मारली आहे. त्याने ८६ मिनिटांतच ही लढत जिंकली. आता त्याची लढत जपानच्या केई निशोकोरीशी पडेल. निशोकोरीने दुसऱ्या सामन्यात जेक प्रजासत्ताकाच्या लुकास रोसोलचादेखील सरळ २ सेटमध्ये पराभव केला.

ब्रिटनच्या अॅंडी मरेनेदेखील आपली आगेकूच कायम राखताना मायकल लोड्राचा पराभव केला. मरेलादेखील ही लढत जिंकण्यास फार प्रयास पडले नाहीत. नुकत्याच झालेल्या इंडियाना व्हेल्स स्पर्धेत उपांत्य फेरीत नादालला फेडररकडून हार खावी लागली होती. या स्पर्धेत त्याचा बदला राफेल घेणार का? ते बघायचे.

## गिली कर्णधार, प्रशिक्षक

चंदिगढ, ता.२६- पाचव्या आयपीएल चषक क्रिकेट स्पर्धेत पंजाब संघाचे नेतृत्व आणि प्रशिक्षकपद अशी दुहेरी जबाबदारी ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार, तडाखेबाज डावखुरा फलंदाज अॅडम गिलख्रिस्टकडे सोपविण्यात आली आहे. गिलख्रिस्टशी तीन वर्षांचा करार पंजाब संघाने केला आहे. विक्रम राठोड गिलीचे सहाय्यक म्हणून काम पाहतील. जो डेवेस यांची क्षेत्ररक्षणाचे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर गोलंदाजीच्या सल्लागारपदी माईक यंगची निवड केली गेली आहे.

## तिसऱ्या कसोटीत न्यूझीलंडची घसरगुंडी



फिलेण्डरची तुफानी गोलंदाजी

वेलिंग्टन, ता.२६- येथे सुरू असलेल्या न्यूझीलंड दक्षिण आफ्रिका संघातील तिसऱ्या कसोटी सामन्यात चौथ्या दिवशी पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेच्या ४७४ या धावसंख्येला उत्तर देताना यजमान न्यूझीलंडचा पहिला डाव २७५ धावांतच गडगडला. सलामीवीर फ्लीन-गुप्टील जोडीने ८६ धावांची चांगली सलामी न्यूझीलंडला करून दिली. परंतु हे दोघे बाद झाल्यानंतर त्यांची दाणादाण उडाली.

सलामीवीर गुप्टीलने सर्वाधिक ५९ धावा केल्या. तर त्याचा सहकारी फिलीनने ४५ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज फिलेण्डरने ८१ धावांत ६ बळी घेऊन न्यूझीलंडची दाणादाण उडविली. त्याअगोदर पहिल्या डावात न्यूझीलंडतर्फे पीटरसन आणि ड्युमिनी यांनी दमदार शतके काढली. चौथ्या दिवसअखेर आफ्रिकेने दुसऱ्या डावात बिनबाद ७५ धावांची जोरदार सुरुवात केली. कर्णधार स्मिथ ३४ आणि पीटरसन ३८ धावांवर खेळत आहेत.



## आरसीएफ, शिवशक्तीची विजयी सलामी



मुंबई, सोमवार- विक्रोळी येथील संभाजी राजे मैदानावर सुरू झालेल्या मुंबई महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत पुरुष गटात आरसीएफ आणि महिला गटात शिवशक्ती संघानी विजयी सलामी दिली. कन्नमवार नगरात सुरू झालेल्या या स्पर्धेत पहिल्या सामन्यात पुरुष गटात आरसीएफने साई स्पोर्टस् क्लबचा ३०-११ गुणांनी आरामात पराभव केला. विजयी संघाचे सचिन पाष्टे, संदीप भट चमकले.

दुसऱ्या सामन्यात मुंबई महानगरपालिकेने बेस्ट कला क्रीडा मंडळाचा चुरशीच्या लढतीत १८-१२ गुणांनी पराभव केला. चिपळूण स्पोर्ट्स क्लबने टागोरनगर मित्र मंडळाचा पराभव केला. महिला विभागात शिवशक्तीने पुण्याच्या आकांक्षा संघावर ७०-१२ गुणांनी दणदणीत विजय मिळविला. रेखा सावंत, धनश्री पोटले, विजयी संघातर्फे छान खेळले.

स्पर्धेचा उद्‌घाटन समारंभ माजी आमदार अॅड.लीलाधर डाके, राज्यसभेचे सदस्य संजय राऊत, माजी मंत्री गजानन किर्तीकर आणि सिने कलाकार, निर्माते महेश कोठारे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

## मुखशुद्धी

डॉक्टरने आपल्या श्रीमंत पेशंट रीमाला सल्ला दिला की, तुम्हाला दररोज सकाळी कमीत कमी दोन किलोमीटर फिरणे आवश्यक आहे. तेव्हाच तुमची तब्येत सुधारेल.

'परंतु डॉक्टरसाहेब फिरायला जाण्यासाठी अजून काही दिवस थांबावे लागेल, कारण माझ्या दोन्ही कार बिघडल्या आहेत,' रीमाने आपली अडचण सांगितली.

## पंचांग

**मंगळवार, २७ मार्च २०१२**

शके १९३४ नंदननामसंवत्सर,
✽ चैत्र शुक्ल पंचमी ● **नक्षत्र:** कृत्तिका
● रवी उदय ०६-३८, रवी अस्त १८-५०
**जन्मराशी:** ००-०१ ते ०४-०३ मेष
०४-०४ ते २४-०० वृषभ
श्री पंचमी, लक्ष्मी पंचमी, देशांतरे नागपूजा

संपादक, मुद्रक, प्रकाशक व संचालक: **सौ. जयश्री खाडिलकर-पांडे**
मुद्रक-प्रकाशन स्थळ : नवाकाळ प्रेस, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगाव, मुंबई -४००००४. टेलिफोन : २३८८०९८१,
जाहिरात विभाग: २३८६०९८७,२३८४१५२४, फॅक्स नं.: २३८१०१७६
वितरण: २३८२४४६६, फॅक्स नं. : २३८६ ०९८९, २३८७ ४९११.
**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**
info@navakal.org
http://navakal.org
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

## कविता: लोकशाहीचे लुटेरे

एका काँग्रेसच्या अध्यक्षांची
तिनशे कोटींची मालमत्ता
जप्त करताना पाहिलंय मी
तर! भूकेने आणि कुपोषणाने
हजारो बालके मरताना... पाहिलंय मी

शंभर गुन्हे करून
तुरुंगातून निवडणुकीचा अर्ज
भरणारे पाहिलेत मी
तर! निष्ठावंत व चारित्र्यवान माणूस
निवडणुकीत हरलेला... पाहिलंय मी

घराणेशाहीने लोकशाहीला
लुटताना पाहिलंय मी
तर! निष्ठावान कार्यकर्त्यांना
अनेक वर्षे झेंडे आणि बॅनर
लावताना... पाहिलंय मी

जनतेच्या पैशातून नागरी सेवा
होताना पाहिलंय मी
तर माझ्यामुळेच सगळं झालं
अशा पाट्या लावून
श्रेय उपटणारे नेते... पाहिलेत मी

**- यल्लापा आ.मोदगेकर**
सी-३५, हनुमान गल्ली नं.१,
भगतसिंग नगर क्र.१, लिंक रोड,
गोरेगाव (प.), मुंबई-१०४.
**मोबा.: ९९३०६ ७७३ ०५**

## मनोगत

# कोयनेचा सुवर्ण महोत्सव थाटात साजरा करण्याबाबत

१६ मे २०१२ रोजी कोयना प्रकल्पाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. कोयनेला अभिवादन करण्याचा असा हा क्षण आहे. या क्षणाचा शासनाने यथोचित गौरव करावा, असे नम्रपणे सुचवावेसे वाटते. अजूनही वेळ निघून गेलेली नाही. शासनाने मनात आणले तर हा समारंभ घडवून आणणे सहज शक्य आहे.

१) कोयनेचा लेक टॅपिंग कार्यक्रम हा १६ मेला आयोजित केल्यास त्याला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होईल.

२) यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी समारंभात एअर चिफ मार्शल यांचा गौरव करण्यात आला तसा १९६२ साली कार्यरत असणाऱ्यांचा सन्मान व्हावा. विशेषत: व्ही. आर. देऊसकर यांचा सन्मानपूर्वक गौरव व्हावा.

३) कोयना प्रकल्पावरील सन्माननीय व्यक्तींना पाचारण करावे.

४) ५० व्या वर्षानिमित्ताने स्मरणिका प्रसिध्द व्हावी.

५) जमल्यास यशवंतराव जन्मशताब्दीचा एक कार्यक्रम कोयनेला व्हावा कारण कोयनेबद्दल त्यांचा जवळचा व जिव्हाळ्याचा संबंध होता.

६) १६ मे १९८७ साली कोयनेचा २५ वर्षानिमित्ताने रजत महोत्सव साजरा करण्यात कोयना प्रकल्पाने व शासनाने फार मोठी कुचराई केली होती. त्याची पुनरावृत्ती टाळावी, असे वाटते. अजूनही भरपूर वेळ आहे परत हा क्षण येणार नाही.

**- जी.आर.देसाई**
**गणपत रामचंद्र देसाई (वय ७८)**, कोयनाधरणग्रस्त
**दूरध्वनी- ९४२ ०३९ ८९०६**
१५/१० श्री विवेकानंद सहकारी सोसायटी
गुरुमंदिर रोड, सारस्वत कॉलनी,
**ठाकुर्ली (पूर्व)**, जिल्हा ठाणे




नवा काळ
मुंबई, मंगळवार २७ मार्च, २०१२ पान - ८




# ही गुंफा नाही प्रसिद्ध विद्यापीठ होते


स्वागत कक्ष

मुंबईत बोरिवलीत संजय गांधी उद्यानाच्या परिसरातच कान्हेरी गुंफा आहेत. पावसाळ्यात कोसळणाऱ्या धबधब्याखाली हुंदडणे आणि महाशिवरात्रीला शंकराची पूजा याचसाठी इथे हजारोंची गर्दी होते. मात्र कान्हेरी गुंफा म्हणजे प्रत्यक्षात अद्भुत अशी वास्तूच आहे. यातील प्रत्येक बांधकाम, प्रत्येक शिल्प हे भारताच्या अत्यंत प्रगत अशा तंत्रविज्ञानाची साक्ष देत उभे आहे. आपले दुर्दैव असे की, आपण या दृष्टीने कान्हेरी गुंफांकडे कधी पाहिलेच नाही. कान्हेरी गुंफा या साध्यासुध्या गुंफा नाहीत. या ११० गुंफा म्हणजे त्या काळात अत्यंत प्रसिद्ध असे बौद्ध विद्यापीठ होते. जपान, चीन अशा अनेक देशांतील शिलालेखांत या विद्यापीठाचा उल्लेख आहे. इथे विद्यार्थी राहायचे आणि ध्यानधारणा आदी शिक्षण घ्यायचे. सतत एक हजार वर्षे वास्तव्य असलेली ही संपूर्ण भारतातील एकमेव गुंफा आहे. नालासोपारा येथे बोटीने उतरून व्यापारीही कान्हेरीवरून कल्याण मार्गाने जुन्नर आणि पुढे जायचे.

# कान्हेरी गुंफा!

# जे पाहाल ते अद्भुत!

● सौ. जयश्री खाडिलकर-पांडे ●


पाणी शुद्धीकरण योजना


डोंगरात पाडलेल्या चिरांमधून पाणी वाहत येऊन टाकीत पडते


धरणाची भिंत

पहिलीच गुंफा दिसते तो स्वागतकक्ष होता. त्यानंतर विद्यार्थ्यांना राहण्यासाठी खोल्या आहेत. अध्ययनासाठी बौद्ध मूर्ती आणि इतिहास कथांनी नटलेली दालने आहेत. प्रत्येक गुंफेच्या दरवाजाबाहेर सुंदर लाकडी द्वारे उभारलेली होती. ज्याच्यासाठी भिंतीत केलेल्या खाचा स्पष्ट दिसतात. जे इथे शिकवायचे अशा जवळजवळ ६० जणांच्या समाधी एका गुंफेत आहेत. या गुंफेला 'निर्वाण विधी' असे नाव आहे.

### प्लास्टर व फॉल्स सिलिंग

प्रत्येक गुंफा थक्क करते. एका गुंफेत छताला प्लास्टर आहे. हे प्लास्टर इसवी सन १ ते १० मधील आहे. एका गुंफेतील खाचांमुळे स्पष्ट होते की, गोलाकार छताखाली लाकडे बसवून कृत्रिम छत अर्थात फॉल्स सिलिंग आहे. एका छतावर लाल रंगाने चित्रे काढली आहेत. त्या काळचे हे रंग आजही तसेच आहेत. शिसे वितळून त्याची विविध अवजारे बनवायची भलीमोठी भट्टीही इथे होती.

### दगडांचे धरण

या विशाल विद्यालयात धरण बांधलेले आहे. हे धरण दुसऱ्या शतकात बांधलेले आहे. लांबलचक दगड खाचा पाडून एकमेकांत बसवून धरणाप्रमाणे दोन भिंती उभ्या आहेत. इथे जे पाणी भरायचे ते तुळशी तलावात जायचे. आणखी आश्चर्य म्हणजे या साठलेल्या पाण्याच्या वाटेवर लाकडी फळी टाकण्याची सोय केली होती. ही फळी टाकली की पाणी अडायचे. मग मध्ये साठलेले पाणी कपडे धुवायला वापरले जायचे. कपडे धुवून झाले की लाकडी फळी उचलून घाण झालेले पाणी सोडायचे की पुन्हा स्वच्छ पाणी वाहणे सुरू व्हायचे. या सर्व गोष्टींच्या अधिकृत नोंदी आहेत.

### पहिल्या शतकातील रेन हार्वेस्टिंग

कान्हेरी गुंफेचे आणखी एक खास आकर्षण म्हणजे प्रत्येक गुंफेसाठी रेन हार्वेस्टिंग योजना आहे. पहिल्या शतकात अगदीच तुरळक लोकवस्ती असणार आहे तरीही पाण्याचे नियोजन केले आहे. आता शहर फुटेल इतकी लोकवस्ती झाल्याने पाण्याची टंचाई असतानाही रेन हार्वेस्टिंगबाबत गांभीर्य नाही.

संपूर्ण डोंगरावर वरपासून खालपर्यंत तिरके तिरके खोदून चिरा खणल्या आहेत. प्रत्येक गुंफेपुढे किमान दोन खूप खोल अशा टाक्या (टाक) आहेत. पावसाळ्यात डोंगरावरून येणारा पाऊस चिरांतून वाहून बरोबर टाक्यात पडायचा. अशा तऱ्हेने पाणी टाक्यांत साठायचे. पाण्याच्या या टाक्या बांधण्यासाठी काही व्यापाऱ्यांनी निधी दिला होता. यातील बहुसंख्य व्यापारी कल्याणचे आहेत. टाक्यांच्या वरच त्या व्यापाऱ्यांची नांवे ब्राह्मणी भाषेत कोरून लिहिली आहेत. पाण्याच्या दोन टाक्यांजवळ प्रत्येक ठिकाणी छोटी सखल टाकी आहे. ही टाकी प्राण्यांना पाणी पिण्यासाठी असायची.


सिद्धांत व श्री. विनायक परब

### जल शुद्धीकरणाची योजना

पावसाचे पाणी साठविण्यासाठी जशी योजना आहे तशीच त्या काळातील जल शुद्धीकरणाची योजनाही आहे. त्यात तीन भाग आहेत. पहिल्या टाकीत वाळूने पाणी गाळून, दुसऱ्यात कोळसा व वाळूने पाणी गाळून तिसऱ्या टाकीत शुद्ध पाणी मिळायचे.

पहिल्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत अशा प्राचीन काळी आपले तंत्रज्ञान इतके प्रगत होते. या प्रगतीचे उदाहरण म्हणजेच कान्हेरी गुंफा आहे. दुर्दैव असे की, कान्हेरी गुंफेच्या निर्मितीची माहिती यापलीकडे प्लास्टरपासून पाण्याच्या टाकीपर्यंत कशाचीच माहिती कुठेच लिहिलेली नाही. त्यामुळे कान्हेरी गुंफेचे महत्त्व कुणालाच कळत नाही.

### विनायक परब यांचे आभार

सुदैव असे की, कान्हेरी गुंफेचे जतन व्हावे यासाठी अनेक वर्षे तळमळीने सतत प्रयत्न करणारे लोकप्रभा मासिकाचे कार्यकारी संपादक विनायक परब यांनी स्वत: वेळात वेळ काढून मला ही सर्व माहिती दिली. त्यांचा पुत्र कु.सिद्धांत परब याच्यातही लहान वयात हीच तळमळ निर्माण झाली आहे. विनायक परब यांनी दिलेल्या माहितीमुळे कान्हेरी गुंफेची खरी ओळख झाली. आता विनायक परब यांचे कार्य पुढे नेण्यासाठी सरकारने त्यांना मदत करावी.


दुसऱ्या शतकातले प्लास्टर


वाचनालय

## नवा काळ ९० वा वर्धापनदिन योजना

प्रश्न क्र. ७) 'इस्त्रो' या संस्थेचे मुख्य कार्यालय कोठे आहे?

पर्याय अ) दिल्ली

पर्याय ब) बंगळुरू

पर्याय क) मुंबई

नवा काळ
९० वा
वर्धापनदिन योजना
अचूक उत्तर पर्याय क्रमांक
प्रश्न क्र. ७

## सीबीआय चौकशीचा आदेश! संसदेमध्ये प्रचंड गोंधळ!

## लष्करप्रमुख व्ही. के. सिंग यांचा खळबळजनक गौप्यस्फोट!

## ६०० वाहने खरेदीसाठी १४ कोटींची लाच देऊ केली!

नवी दिल्ली, ता. २६- अत्यंत खळबळजनक व सनसनाटी अशी घटना घडली आहे. भारताचे लष्करप्रमुख व्ही. के. सिंग यांनी खळबळजनक असा गौप्यस्फोट केला आहे. यामुळे खळबळ उडाली आहे.

जनरल व्ही. के. सिंग यांनी असा गौप्यस्फोट केला आहे की, सहा महिन्यांपूर्वी दलालांकडून १४ कोटी रुपयांची लाच देऊ करण्यात आली होती. दुय्यम दर्जाच्या ६०० वाहनांच्या खरेदीला मंजुरी देण्यात आली. यासाठी ही १४ कोटींची लाच देऊ करण्यात आली.

### सीबीआय चौकशीचा आदेश

लष्करप्रमुख जनरल व्ही. के. सिंग यांनी सांगितले की, याबाबत आपण त्वरित संरक्षण मंत्री ए. के. अँटोनी यांना माहिती दिली. याप्रकरणी सीबीआय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

### संसदेत गोंधळ

दरम्यान, या खळबळजनक गौप्यस्फोटाचे संसदेच्या दोन्ही सभागृहांत तीव्र पडसाद उमटले. दोन्ही सभागृहांमध्ये प्रचंड गोंधळ झाला. याप्रकरणी त्वरित चर्चा व्हावी, अशी मागणी विविध पक्षांकडून करण्यात आली.

दरम्यान ना. ए. के. अँटोनी यांनी संसदेबाहेर याप्रकरणी अधिक बोलण्यास नकार दिला. हे प्रकरण गंभीर असल्याचे त्यांनी सांगितले.




## दुष्काळात तेरावा! धरणात जेमतेम पाणी! पाण्याचे अन्य स्त्रोत शोधावे लागणार

कराड, ता. २६ - दिवसेंदिवस उन्हाळा आग ओकू लागल्याने आगामी काळात वाढती पाणीटंचाई लक्षात घेऊन सातारा जिल्ह्याच्या दुष्काळी तालुक्यांतील धरणांमधील पाणीसाठा राखीव केल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात मात्र धरणांतील पाणी संपत आले असून जेमतेम पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे आगामी काळात पाणीटंचाईच्या झळा आणखी तीव्र होणार आहेत. टंचाई निवारणासाठी धरणामधील पाणी पुरणार नाही. त्यामुळे प्रशासनास पाण्यासाठी दुसरा पर्याय शोधावा लागणार आहे. धोम-बलकवडी व धोम धरणातून चाऱ्यासाठी प्रत्येकी दोनशे क्युसेस पाणी खंडाळा तालुक्यात सोडण्यात आलेले आहे. दरम्यान, कोयना धरणात ५८.५ टीएससी पाणीसाठा असून, कोयना धरणाची पाणीपातळी २११६.५ फूट आहे. सिंचनासाठी आतपर्यंत १३ टीएमसी,तर वीजनिर्मितीसाठी ५५ टीएमसी पाणी वापरले आहे. वीजनिर्मितीसाठी आणखी १२ टीएमसी पाणी शिल्लक असल्याचे कोयना धरण विभागातून सांगण्यात आले.

गेल्या वर्षी पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले आहे. त्यातच उन्हाळी एकही पाऊस न झाल्याने सध्या जिल्ह्यातील माण, खटाव फलटण व खंडाळा या कायम दुष्काळी तालुक्यांत तीव्र टंचाई परिस्थिती निर्माण झाली आहे.

पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत आटल्याने या चार तालुक्यांत टँकरने पाणीपुरवठा होत आहे. पाणीटंचाई आगामी काळात आणखी तीव्र होणार असल्याने जिल्हा प्रशासनाने धरणांतील पाणीसाठे राखीव केले आहेत.मात्र,मुळात धरणात अल्प पाणीसाठा शिल्लक आहे. हा पाणीसाठा आगामी तीन महिने नव्हे,तर महिनाभर देखील पुरणार नाही. त्यामुळे टंचाई निवारणासाठी धरणांवर विसंबून राहता येणार नाही. सध्या कण्हेर धरणातून सांगलीला एक्स्प्रेस कालव्याद्वारे ५५० क्युसेस पाणी सोडले आहे, तर उजव्या कालव्याद्वारे २०० क्युसेस पाणी सोडण्यात येत आहे.

